MAHARA

THE MAHARASHTRA C PONE-
MENT

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ७ सप्टेंबर १९७३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 1973

**AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF CONFIRMATION IN SERVICE OF TEACHERS IN AFFILIATED AND CONSTITUENT COLLEGES OF CERTAIN UNIVERSITIES IN VIEW OF PROPOSED REVISION OF THE PATTERN OF EDUCATION.**

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक ८ सप्टेंबर १९७३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३

**शिक्षण पद्धतीमधील नियोजित सुधारणेच्या दृष्टीने, विवक्षित विद्यापीठांच्या संलग्न व घटक महाविद्यालयातील अध्यापकांचे सेवेतील स्थायीकरण तहकूब करण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** सध्या, राज्यातील कला, विज्ञान, वाणिज्य किंवा अभियांत्रिकी या विषयांचा पदवी पाठ्यक्रम चार वर्षांचा आहे व राज्यातील शाळांचा पाठ्यक्रम दहा किंवा अकरा वर्षांचा आहे ;

**आणि ज्याअर्थी,** माध्यमिक शिक्षणाचा पाठ्यक्रम दहा वर्षांचा, उच्च माध्यमिक शिक्षणाचा पाठ्यक्रम दोन वर्षांचा आणि कला, विज्ञान, वाणिज्य किंवा अभियांत्रिकी या विषयांचा पदवी पाठ्यक्रम तीन किंवा अधिक वर्षांचा होईल अशा रीतीने राज्यातील विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण पद्धतीत सुधारणा करण्याचे योजिले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाविद्यालयात तसेच, निवडक उच्च माध्यमिक शाळांमध्ये उच्च माध्यमिक शिक्षणाचा दोन वर्षांचा पाठ्यक्रम सुरू करण्याचे योजिले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** वरील गोष्टींच्या परिणामी, विवक्षित विद्यापीठांच्या संलग्न किंवा घटक महाविद्यालयांतील अध्यापकांची संख्या कमी करावी लागेल आणि त्यासाठी महाविद्यालयातील अध्यापकांचे सेवेतील स्थायीकरण तहकूब करण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा त्यास आनुषंगिक असलेल्या बाबींकरिता कायदा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या चौविसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव आणि प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महाविद्यालयीन अध्यापक (स्थायीकरण तात्पुरते तहकूब करणे) अधिनियम, १९७३ असे म्हणता येईल.

(२) तो ३१ मे १९७३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "महाविद्यालय" म्हणजे, संलग्न किंवा घटक महाविद्यालय (परंतु त्यामध्ये शासकीय महाविद्यालयाचा समावेश होणार नाही) ;

(ब) "संबद्ध अधिनियम" म्हणजे, ज्या अधिनियमान्वये विवक्षित विद्यापीठ स्थापन झाले असेल असा, पुणे विद्यापीठ अधिनियम, १९४८, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९४९, मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९५३, मराठवाडा विद्यापीठ अधिनियम, १९५८, शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९६२ किंवा यथास्थिति नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९६३ ;

(क) एखाद्या महाविद्यालयाच्या संबंधात, "विद्यापीठ" म्हणजे, यथास्थिति, ज्या विद्यापीठाशी ते महाविद्यालय संलग्न असेल किंवा ज्या विद्यापीठाचे ते घटक महाविद्यालय असेल असे, पुणे विद्यापीठ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ किंवा यथास्थिति, नागपूर विद्यापीठ ;

(ड) या अधिनियमात वापरण्यात आलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांचे संबद्ध अधिनियमात जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच त्यांचे अर्थ असतील.

महाविद्यालयांतील अध्यापकांची स्थायीकरण तात्पुरते तहकूब करणे. ३. संबद्ध अधिनियमात, (आणि तदन्वये करण्यात आलेले परिनियम, अध्यादेश, विनियम आणि नियम यांमध्ये) किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीमध्ये किंवा कोणत्याही करारामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाविद्यालयाचा जो अध्यापक अस्थायी कर्मचारी असेल किंवा जो परिवीक्षाधीन असून महाराष्ट्र महाविद्यालयीन अध्यापक (स्थायीकरण तात्पुरते तहकूब करणे) अध्यादेश, १९७३ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी ज्यास कायम करण्यात आले नसेल अशा अध्यापकास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासन नेमील अशा तारखेपर्यंत कायम करण्यात येणार नाही ; आणि त्यास एक महिन्याची नोटीस देऊन, किंवा त्याबद्दल वेतन देऊन, त्याच्या सेवा महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाकडून कोणत्याही वेळी, समाप्त केल्या जाण्यास पात्र ठरतील :

परंतु, कोणत्याही अध्यापकाचे स्थायीकरण तहकूब करण्यात आले असेल किंवा कोणत्याही अध्यापकाच्या सेवा समाप्त करण्यात आल्या असतील त्याबाबतीत, उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्याने धारण केलेल्या पदाशी तुल्य किंवा निम्न असलेले अध्यापकाचे पद, महाविद्यालयात किंवा उच्च माध्यमिक शिक्षणाच्या त्याच व्यवस्थापनाखाली भरण्यात यावयाचे असेल तेव्हा अशा कोणत्याही अध्यापकास, प्रथम पसंतीक्रम देण्यात येईल. उक्त अध्यापक असे देऊ केलेले पद स्वीकारील तर, उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्यास जे वेतन मिळत होते त्या वेतनापेक्षा कमी नसेल अशा वेतनावर अशा पदावर व्यवस्थापनाकडून त्याची नेमणूक करण्यात येईल, परंतु वेतनश्रेणी आणि सेवेच्या इतर शर्ती (कार्यभारधरून), त्याने स्वीकारलेल्या पदाशी संलग्न असलेल्या अशा असतील.

४. (१) महाराष्ट्र महाविद्यालयीन अध्यापक (स्थायीकरण तात्पुरते तहकूब करणे) अध्यादेश, सन १९७३ महाराष्ट्र अध्यादेश १९७३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे किंवा नऊचे निरसन तदन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती ही, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांद्वारे व व्यावृत्ती. किंवा तदन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कृती असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

वा. म. कुलकर्णी,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.